# नारायण राणे चालतात! मग खडसे का खटकतात?

महाराष्ट्रातील सामान्य माणसाला आणि प्रामुख्याने भाजपाच्या कार्यकर्त्यांना एक प्रश्न सतावित आहे, तो म्हणजे भाजपाला नारायण राणे चालतात तर एकनाथ खडसे का नको झाले आहेत? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'सामाजिक कार्यकर्त्यांना' हाताशी धरून एकनाथ खडसेंना खड्यासारखे उचलून दूर केले आणि स्वत:ची खुर्ची स्थिर केली असे म्हणता येईल. पण मुळात मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीचे सर्व लगाम अमित शहांच्या हातात असल्यामुळे ही खुर्ची स्थिर राहणे जवळजवळ अशक्यच आहे. पंतप्रधान मोदी आणि अमित शहा यांच्या जेव्हा मनात येईल तेव्हा देवेंद्र फडणवीस केंद्रात जातील, अशी सतत चर्चा सुरू ठेवून खुर्चीवर पूर्णवेळ दबाव आणून ठेवलेलाच आहे. त्यामुळेच प्रश्न पडतो की, भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे खडसेंना दूर केले असेल तर नारायण राणेंना कोणत्या निकषावर मंत्रिमंडळात घेण्याचा निर्णय घेतला आहे? आम्ही एकनाथ खडसेंची बाजू घेत आहोत, अशी कुणी टीका करू नये. याबाबत सवाल इतकाच आहे की, दोन वाईट प्रवृत्तींपैकी कोणती प्रवृत्ती अधिक वाईट आहे, याचा निर्णय घेता येत नाही. त्यामुळे दोन वाईट प्रवृत्तींपैकी एकाला

**संपादकीय**

जयश्री खाडिलकर-पांडेकृत

जवळ करायचे असेल तर त्यातला आपला माणूस सोडून परक्याला जवळ करण्याचा निर्णय का घेतला आहे? भाजपा कार्यकर्त्यांना याचे उत्तर हवे आहे आणि त्यांना ते उत्तर देणे आवश्यक आहे. हे उत्तर दिले नाही तर सत्तेच्या शर्यतीत राहणाऱ्या भाजपा नेत्याचा मुंडे होतो किंवा खडसे होतो, अशी भावना निर्माण होईल. या दडपशाहीच्या भावनेतून भाजपालाच इजा होणार आहे. भाजपात नेत्यांची फौज निर्माण न होता आज महाराष्ट्रात जी स्थिती आहे, त्याप्रमाणे खुज्यांची फौज निर्माण होत राहील. केंद्राच्या तालावर नाचणारे खुजे आणि केंद्रातील भक्कम नेता दूर झाला की ढासळणारे खुजे ही भाजपाची ओळख बनेल.

एकनाथ खडसे हे भाजपाचे ज्येष्ठ नेते आहेत. भाजपाला अस्तित्व नव्हते तेव्हापासून त्यांनी संघटना बांधणी केली. अनेक अधिवेशनात विधानसभा गाजवून त्यांनी विरोधकांना सळो की पळो केले. सरकारी अधिकाऱ्यांवर त्यांची पकड आहे. पण प्रदीर्घ काळ त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप होत राहिले आणि शेवटी याच कारणाने त्यांना दूर केल्याचे चित्र निर्माण करण्यात आले. मात्र 'स्वच्छ आणि शालीन' प्रतिमा मिरवणाऱ्या भाजपाने त्यानंतर अनेक भ्रष्ट, गुंड व्यक्तिमत्त्वांना भाजपात घेतले. त्याबाबत त्यांना जाब विचारला तेव्हा भाजपाने 'ऐतिहासिक' उत्तर दिले की, भाजपात प्रवेश झाल्यावर वाल्याचा वाल्मिकी होतो. आता अशी स्थिती आहे की, पक्षात वाल्यांची संख्या वाढल्याने वाल्मिकी पक्ष सोडून चाललेत किंवा जे वाल्मिकी पक्षात टिकलेत त्यांचाच वाल्या होऊ लागला आहे.

एकनाथ खडसेंना 'भ्रष्टाचारा'च्या नावाखाली बाजूला केले असेल तर नारायण राणेंना आणताना कोणत्या पापांवर 'गंगाजल' सोडले जाणार आहे? नारायण राणेंच्या जुहूच्या बंगल्यापासून दर निवडणुकीत एक बळी जातो, इथपर्यंत त्यांच्यावर ट्रक भरून आरोप आहेत. यातील एकही आरोप अद्याप सिद्ध झाला नसला तरी हे व्यक्तिमत्त्व डागाळलेलेच आहे. त्यांची राजकीय शक्तीही रसातळाला गेली आहे, त्यामुळेच त्यांचा संयम दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. ते ज्या ज्या पक्षातून बाहेर पडले त्या त्या पक्षाच्या नेत्याच्या विरोधात ते वाटेल ते बोलले, हा इतिहास आहे. सर्वात धोकादायक बाब म्हणजे त्यांचे दोन पुत्र कधी काय करतील, हे सांगता येत नाही. यामुळे नारायण राणेंना मंत्रीपद दिले की, जो परिणाम सुरू होईल, त्याला तोंड देणे भाजपालाही अशक्य होईल. नारायण राणेंना स्वतंत्र पक्ष काढायला लावला आणि त्या मित्र पक्षाचे नेते म्हणून त्यांना मंत्रीपद देण्याची सावधगिरी भाजपाने बाळगली असली तरी हा पेटता निखारा आहे. हा निखारा जाळपोळ करीत जखम करणारच. नारायण राणेंनी भाजपाशी सलगी केल्यावर काही महिन्यांतच त्यांनी मुख्यमंत्र्यांना इशाराही दिला. याचा शेवट काय होईल हे सर्वांनाच माहीत आहे. उद्धव ठाकरे, अशोक चव्हाण यांच्यानंतर देवेंद्र फडणवीसांवर राणे कधीही पत्रकार परिषद घेतील.

भाजपाने निवडणूक जिंकण्यासाठी सर्व प्रकारच्या प्रवृत्तींना जवळ करण्याचा निर्णय घेतला आहे. भाजपासाठी यशाचा मार्ग महत्त्वाचा नाही. अयोग्य मार्गाने यश मिळविले तर ते फार काळ टिकत नाही हे माहीत असूनही पक्ष वाटेल त्या मार्गाने जाण्यास तयार आहे.म्हणूनच मग प्रश्न पडतो की, नारायण राणे चालतात तर मग खडसे का खटकतात?